भारत सरकार

विधी, न्याय व कंपनी कार्य मंत्रालय

सत्यमेव जयते

# जातिमूलक निःसमर्थता निवारण अधिनियम, १८५०

(सन १८५० चा अधिनियम क्रमांक २१)

[दिनांक २८ फेब्रुवारी १९९३ रोजी यथाविद्यमान]

# The Caste Disabilities Removal Act, 1850

(Act No. 21 of 1850)

[As in force on the 28th February 1993]

संचालक, मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी
भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले.
१९९४
[किंमत : रु. १.९० पैसे]

## प्राक्कथन

या आवृत्तीत, दिनांक २८ फेब्रुवारी १९९३ रोजी यथाविद्यमान असलेला कास्ट डिसॅबिलिटीज रिमुवल अॅक्ट, १८५० याचा मराठीतील प्राधिकृत पाठ दिलेला आहे. हा पाठ भारताचे राजपत्र, असाधारण, भाग बारा, अनुभाग १, खंड ५, अंक २, दिनांक ३० जून १९९४ यात पृष्ठ ५२ ते ५३ मध्ये प्रकाशित करण्यात आला होता. हा प्राधिकृत मराठी पाठ, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ याच्या कलम २, खंड (क) अन्वये राष्ट्रपतींच्या प्राधिकाराने प्रकाशित करण्यात आला होता आणि अशा रीतीने प्रकाशित करण्यात आल्यानंतर हा पाठ, उक्त अधिनियमाचा प्राधिकृत मराठी पाठ म्हणून समजण्यात आला आहे.

**के. एल. मोहनपुरिया,**
सचिव,
भारत सरकार.

नवी दिल्ली,
दिनांक ३० जून १९९४.

---

## PREFACE

This edition of the Caste Disabilities Removal Act, 1850 as on the 28th February 1993 contains the authoritative text of that Act in Marathi which was published in the *Gazette of India* Extraordinary, Part XII, Section 1, No. 2, Vol. 5, dated 30th June 1994 on pages 52 to 53.

This authoritative text was published under the authority of the President under section 2 clause (*a*) of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 and on such publication it became the authoritative text of that Act in Marathi.

K. L. MOHANPURIYA,
Secretary to the
Government of India.

New Delhi,
Dated 30th June 1994.

एच ४२२८ (१,०२१—१—९५)

# जातिमूलक नि:समर्थता निवारण अधिनियम, १८५०

---

कलमांचा क्रम

---

कलमे

१. ज्या कायद्यानुसार किंवा परिपाठानुसार धर्मांतरामुळे किंवा जातिभ्रष्टतेमुळे हक्क गमवावे लागतात किंवा त्यांना बाध येतो त्या कायद्याची किंवा परिपाठाची बजावणी बंद होणे.

२. संक्षिप्त नाव व विस्तार.

शब्दसूची—

मराठी-इंग्रजी

इंग्रजी-मराठी

# जातिमूलक निःसमर्थता निवारण अधिनियम, १८५०[1]

**(सन १८५० चा अधिनियम क्रमांक २१)**

[ दिनांक २८ फेब्रुवारी, १९९३ रोजी यथाविद्यमान ]

[ ११ एप्रिल, १८५० ]

**बंगाल संहितेतील १८३२ चा विनियम सात याचा कलम ९ चे तत्त्व संपूर्ण [2][भारतभर] लागू करण्याबाबत अधिनियम.**

ज्याअर्थी, [3][ बंगाल संहितेतील ] सन १८३२ चा विनियम सात (१८३२ चा बंगाल विनियम क्रमांक सात) याच्या कलम ९ द्वारे असे अधिनियमित केले आहे की, "जेव्हा कोणत्याही दिवाणी दाव्यात, त्यातील, पक्षकार हे निरनिराळ्या धममतांचे असून, जेव्हा एक पक्षकार हिंदू व दुसरा पक्षकार मुसलमान धर्ममतांचे किंवा हिंदू धर्ममतांचेही नसतील तेव्हा, त्या धर्मांचे कायदे अशा पक्षकारास किंवा पक्षकारांना लागू केले नसते तर, त्यांचा ज्या कोणत्याही संपत्तीवर हक्क राहिला असता त्या संपत्तीनुसार ते

---

१. भारतीय संक्षिप्त नावे अधिनियम, १८९७ (१८९७ चा १४) याद्वारे देण्यात आलेले संक्षिप्त नाव.

हा अधिनियम वऱ्हाडचा कायदेविषयक अधिनियम, १९४१ (१९४१ चा ४) याद्वारे वऱ्हाड प्रांताला लागू करण्यात आला असून कायद्यांचा स्थानिक विस्तार अधिनियम, १८७४ (१८७४ चा १५) च्या कलम ३ द्वारे, अनुसूचित जिल्हे वगळता, तो सर्व प्रांतामध्ये अंमलात असल्याचे जाहीर करण्यात आले आहे.

तो, संथाळ परगणे वसाहत विनियम, १८७२ (१८७२ चा ३) याच्या कलम ३ द्वारे संथाळ परगण्यांमध्ये अंमलात असल्याचे जाहीर करण्यात आले आहे.

तो, अनुसूचित जिल्हे अधिनियम, १८७४ (१८७४ चा १४) याच्या कलम ३ (क) खालील अधिसूचनेद्वारे पुढील अनुसूचित जिल्ह्यांमध्ये अंमलात असल्याचे जाहीर करण्यात आले आहे :—

| | |
|---|---|
| पश्चिम जलपायगुडी .. .. | **भारताचे राजपत्र**, १८८१, भाग एक, पृष्ठ ७४ पहा. |
| हजारीबागचे जिल्हे, लोहारडागा (आताचा रांची) जिल्हा (**कलकत्ता राजपत्र**, १८९९, भाग एक, पृष्ठ ४४ पहा) आणि मानभूम आणि परगणा. | |
| धालभूम आणि सिंगभूम जिल्ह्यातील कोलहण .. | **भारताचे राजपत्र**, १८८१, भाग एक, पृष्ठ ५०४. |
| मिरझापूर जिल्ह्याचा अनुसूचित भाग .. | **भारताचे राजपत्र**, १८७९, भाग एक, पृष्ठ ३८३. |
| जोनसर बवर .. .. | वरीलप्रमाणे १८७९, भाग एक, पृष्ठ ३८२. |
| जिल्हा लाहोल .. .. .. | वरीलप्रमाणे १८८६, भाग एक, पृष्ठ २०१. |
| मध्यप्रांताचे अनुसूचित जिल्हे .. .. | वरीलप्रमाणे १८७९, भाग एक, पृष्ठ ७७१. |
| गंजम आणि विजागापट्टणम् मधील अनुसूचित जिल्हे .. .. .. | वरीलप्रमाणे १८९८, भाग एक, पृष्ठ ८७०. |
| कूर्ग .. .. .. | वरीलप्रमाणे १८७९, भाग एक, पृष्ठ ७४७. |
| आसाम (उत्तर लुशाई टेकड्या वगळता) .. | **भारताचे राजपत्र**, १८९७, भाग एक, पृष्ठ २९९. |
| सिंधभूम जिल्ह्यातील पुराहत वसाहत .. | **भारताचे राजपत्र**, १८९७, भाग एक, पृष्ठ १०५९. |

तो, शेवटी उल्लेख केलेल्या अधिनियमाच्या कलम ५ खालील अधिसूचनेद्वारे तो पुढील अनुसूचित जिल्ह्यांना लागू करण्यात आला आहे :—

| | |
|---|---|
| कुमाअन आणि गढवाल .. .. | **भारताचे राजपत्र**, १८७६ भाग एक, पृष्ठ ६०६. |
| आग्रा प्रांताचे तराई क्षत्र .. .. | वरीलप्रमाणे १८७६, भाग एक, पृष्ठ ५०५. |

तो, नवीन प्रांत व विलीन राज्य यांनाही लागू करण्यात आला आहे. पहा-१९४९ चा अधिनियम, ५९.

२. १९५१ चा अधिनियम, ३ याच्या कलम ३ व अनुसूचीद्वारे "ईस्ट इंडिया कंपनी सरकारच्या अधीन असलेल्या प्रदेशास" या मजकुराऐवजी घातले.

३. बंगाल, वायव्य प्रांत आणि आसाम दिवाणी न्यायालये अधिनियम, १८८७ (१८८७ चा १२) याद्वारे निरसित झालेला बंगाल दिवाणी न्यायालये अधिनियम, १८७१ (१८७१ चा ६) याद्वारे निरसित.

वंचित होतील अशा रीतीने त्या धर्माचे कायदे त्या पक्षकारांना लागू करण्यात येणार नाहीत" ; आणि ज्याअर्थी, त्या अधिनियमातील तत्त्व संपूर्ण [1][भारत] भर लागू करणे हिताचे ठरेल ; त्याअर्थी, त्याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियमित करण्यात आले आहे :—

ज्या कायद्यानुसार किंवा परिपाठानुसार धर्मांतरामुळे किंवा जातिभ्रष्टतेमुळे हक्क गमवावे लागतात किंवा त्यांना बाध येतो त्या कायद्याची किंवा परिपाठाची बजावणी बंद होणे.

१. [1][भारतात] सध्या अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याच्या किंवा परिपाठाच्या कोणत्याही भागानुसार कोणत्याही व्यक्तीस, त्याने किंवा तिने कोणताही धर्म सोडून दिल्यामुळे किंवा त्याच्या सांघिक धर्माचरणापासून त्याला किंवा तिला वर्जित करण्यात आल्यामुळे किंवा जातिभ्रष्ट करण्यात आल्यामुळे आपले हक्क किंवा संपत्ती गमवावी लागत असेल, किंवा त्यामुळे अशा व्यक्तींचा कोणताही वारसा-हक्क कोणत्याही प्रकारे कमी होत असल्याचे किंवा त्याला बाध येत असल्याचे मानले जात असेल तर, अशा कायद्याचा किंवा परिपाठाचा तो भाग कायदा म्हणून [2][कोणत्याही न्यायालयात] बजावला जाण्याचे बंद होईल.

संक्षिप्त नाव व विस्तार.

[3][२. (१) या अधिनियमाला "जातिमूलक निःसमर्थता निवारण अधिनियम, १८५०" असे म्हणता येईल.

(२) त्याचा विस्तार जम्मू व काश्मीर राज्य खेरीजकरुन संपूर्ण भारतभर आहे.]

---

१. १९५१ चा अधिनियम ३, कलम ३, व अनुसूचीद्वारे "ईस्ट इंडिया कंपनी सरकारच्या अधीन असलेल्या प्रदेशास" या मजकुराऐवजी घातले.

२. १९५१ चा अधिनियम ३, कलम ३ व अनुसूचीद्वारे "ईस्ट इंडिया कंपनीच्या न्यायालयात आणि उक्त प्रदेशास रॉयल चार्टरने प्रस्थापित केलेल्या न्यायालयात" या मजकुराऐवजी घातले.

३. वरील अधिनियमाच्या कलम ३ व अनुसूचीद्वारे जादा दाखल केले.

# जातिमूलक निःसमर्थता अधिनियम, १८५०

## THE CASTE DISABILITIES REMOVAL ACT, 1850

### मराठी–इंग्रजी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| जातिभ्रष्ट करणे | deprive of caste | [ क. १ ] |
| जातिमूलक निःसमर्थता | caste disabilities | [ संक्षिप्त नाव ] |
| धर्ममत | persuasion | [ उद्देशिका ] |
| वारसाहक्क | right of inheritance | [ क. १ ] |
| सांघिक धर्माचरणापासून वर्जित करणे | exclude from the communion of religion | [ क. १ ] |

## THE CASTE DISABILITIES REMOVAL ACT, 1850

# जातिमूलक निःसमर्थता अधिनियम, १८५०

### इंग्रजी–मराठी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| caste disabilities | जातिमूलक निःसमर्थता | [ Short title ] |
| deprive of caste | जातिभ्रष्ट करणे | [ S. 1 ] |
| exclude from the communion of religion | सांघिक धर्माचरणापासून वर्जित करणे | [ S. 1 ] |
| persuasion | धर्ममत | [ Preamble ] |
| right of inheritance | वारसाहक्क | [ S. 1 ] |

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई